# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ४६९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०२/०८/२०१६.

**१) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०८/२०१६ चे १६.०० ते १६.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन निलज फाटा येथे आम रोडवर उभी करुन येणा—या वाहतुकीस अडथळा करीत असतांनी मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत

**२) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

**अ)** दिनांक ०१/०८/२०१६ रोजी १८.३० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३५/९५१४ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत पोस्टे लाखनी समोरील सर्वीस रोड  येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे डॉक्टर परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १८५,१२८/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०१/०८/०१६ चे १९.१५ ते १९.३५ वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३५ एक्स ०६५९ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत साखर कारखाण्या समोर लाखांदुर येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लाखडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) शुल्लक कारणाने मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १५/०७/२०१६ रोजी १६.३० वा. दरम्यान फिर्यादी ही आपल्या शेतात मजुरा सोबत रोवना करीत असतांना यातील आरोपीने 'आपल्या शेतातील पाणी माझे शेतात येवु देवु नकोस, या कारणावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन चिखलात पाडुन विळयाने मुठीने मारुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने  फिर्यादी यांचे तोडीं रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,३२३,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहे.

४) सर्पद्वंशाने उपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :–

दिनांक ३०/०७/०१६ रोजी १९.१५ वा. दर यातील मृतक सौ. अर्चना धिरज उके वय ३५ वर्ष, रा. वाघबोडी ही घराच्या छपरीत खाटेवर झोपली असतांना तिचे डावे पायाचे पोटरीला साप चावल्याने तिला औषधोउपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले. असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो. स्टे. अडयाळ येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. गि–हेपुंजे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. मस्के पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

५) किटक नाशक औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–

दिनांक ०६/०७/०१६ रोजी ८.०० वा. ते ९.०० वा. दर यातील मृतक राधेशाम शंभु मडावी वय २१ वर्ष, रा. अंबाडी याने थिमेट नावाचे किटक नाशक औषधी प्राशन केल्याने त्यास औषधउपचारा करीता नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे. कारधा येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. राठोड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक ०२/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०१ केसस, तिन सिटर वाहनांवरती १६ केसेस व इतर वाहनांवरती ११४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.